# अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पुर्व), मुंबई -५१.
दुरध्वनि क्र .:- २६४००७६४ फॅक्स क्र.:-६५५६८०५ई-मेल आयडी :-collectormngmsd@gmail.com

क्र.अ.जि./डेस्क-४/यांत्रिक रेती लिलाव कावि - १६७२/२०१७-१८

दिनांक :०५/१२/२०१७.

## ई-निविदेसह ई-लिलाव सूचना

**सन २०१७-१८ करिता दिनांक ३० जून,२०१८पर्यंतच्या मुदतीसाठी रेती/वाळू लिलाव.**

**यांत्रिक साधनाद्वारे वाळू / रेती उत्खननासाठी राखीव गटांकरीता दिनांक ३० जून,२०१८पर्यंतच्या मूदतीसाठी ई - निविदे सह ई-लिलाव (सन २०१७-१८)**

**सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २१ मे, २०१५ अन्वये निश्चित केलेले धोरण.**

मुंबई उपनगर जिल्ह्यातील मालाड खाडी (वर्सोवा) पात्रातील यांत्रिक साधनांद्वारे रेती उत्खननासाठी राखीव असलेल्या सोबतचे प्रपत्र-अ मध्ये नमूद केलेल्या २ रेती उपगटांच्या निर्गतीसाठी ई-निविदेसह प्रथम लिलावासाठी ई-लिलाव पध्दतीचा अवलंब करण्यात येणार असून सदर प्रक्रिया सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती निर्गती धोरण दिनांक २१ मे, २०१५ अन्वये शासन पर्यावरण विभागाकडील पर्यावरण विषयक मान्यतेचे अधिन राहून तसेच CRZ व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडील प्राधिकार क्र.ममेबो/मु.का.अ/जआ/टी-९९ XI/उत्खनन वर्सोवा/ २०१७-१८/८४३, दिनांक १६/०९/२०१७ व सर्व्हेक्षण अहवालामधील अटी व शर्तीस अधिन राहून राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचेकडील पत्र दि. १६/०९/२०१७ नुसार पर्यावरण विभागाची पर्यावरण विषयक अंतिम अनुमती मिळाल्यानंतरच संबधित ठेकेदाराल नौकानयन मार्गात असलेल्या रेतीचे उत्खनन कामाचे कार्य आदेश (Work Order) देण्यात येतील.

१. ई-निविदेसह ई-लिलाव प्रक्रियेसाठी ICICI बँक व ABC Procure, अहमदाबाद यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

२. या लिलावाच्या प्रक्रियेसंबंधी सर्व माहिती, वाळू/रेती उत्खननासंबंधी अटी व शर्ती यांची सविस्तर माहिती **http://mumbaisuburban.abcprocure.com** या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

३. या लिलाव प्रक्रियेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहिल.

| अ.क्र. | दिनांक | वेळ | प्रक्रिया |
|---|---|---|---|
| १ | ७/१२/२०१७ | सकाळी ११.०० पासून | प्रक्रियेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींचे/संस्थेचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन व मान्यतेनंतर ई-निविदा भरणे सुरु होईल. |
| २ | १६/१२/२०१७ | सायं.५.०० | ऑनलाईन रजिस्ट्रेशन बंद होईल. |
| ३ | २०/१२/२०१७ | सायं.५.०० | ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने स्विकारणे बंद होईल. |
| ४ | २२/१२/२०१७ | सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत. | ई-लिलाव प्रक्रिया सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत. वेळ समाप्तीच्या वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणालीद्वारे प्रत्येकी १० मिनीट प्रमाणे ३(तीन) वेळा वाढ करण्यात येईल. |
| ५ | २२/१२/२०१७ | -- | उक्त लिलावाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर ई-निविदा डाऊनलोड करुन उघडण्यात येईल व ई-निवीदा/ ई-लिलाव यातील उच्चतम बोली निश्चित करण्यात येईल. |

४. लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी मागील ३ वर्षांची (आर्थिक वर्ष-२०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७)आयकर विवरणपत्रे, पॅन कार्ड,आधारकार्ड, टॅन कार्ड (कंपनी असल्यास) व निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र देणे बंधनकारक राहिल.

५. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी सूचित केल्याप्रमाणे लिलावाचा कालावधी हा ०१ ऑक्टोबर ते ३० जून राहील. कार्यारंभ आदेशाच्या (Work Order) तारखेपासून ३० जून २०१८ पर्यंत राहील .

६. ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहिल.

७. ई-निविदेसह ई-लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यास प्रत्येक रेती उपगटासाठी पुढीलप्रमाणे ना परतावा फी ऑनलाईन पध्दतीनेअदा कराव्या लागतील.

   i. नोंदणी फी फक्त एकदाच रु.२९५०/-
   ii. फॉर्म फी प्रत्येक वाळू उपगटाकरीता स्वतंत्र रु. ५०००/- (दहा लाखांपेक्षा जास्त अपसेट प्राईस असलेल्या वाळू उपगटाकरीता).
   iii. प्रक्रिया फी (प्रत्येक वाळू उपगटाकरीता स्वतंत्र) रु. १५९३/-

८. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीला प्रत्येक रेती उपगटासाठी प्रपत्र "अ" च्या रकाना १० मध्ये नमूद केलेली रक्कम अनामत रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल.

९. ई-निविदा व ई-लिलावाच्या प्रक्रियेबाबत दिनांक- **११/१२/२०१७** रोजी सकाळी **११.३०** वाजता जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय, येथे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे. इच्छुक व्यक्तींना या प्रशिक्षणासाठी उपस्थित राहता येईल. ज्या व्यक्तींना या प्रशिक्षणासाठी उपस्थित राहणे शक्य नसेल त्यांना **http://mumbaisuburban.abcprocure.com** या संकेतस्थळावर याबाबतचे सादरीकरण (प्रात्यक्षिक) पाहता येईल.

१०. ई-निविदा व ई-लिलावाबाबत कोणत्याही अडचणी असल्यास **०२२-२६४००७६४/ ०२२-२६५५६८०६** या क्रमांकावर जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचेशी संपर्क साधता येईल.

११. जलमार्गातील ड्रेजर संख्या :- गटनिहाय देण्यात आलेल्या उत्खनन साठ्यानुसार, ज्या ठेकेदाराने ज्या गटाचा ठेका घेतला आहे, त्या गटातील उपलब्ध उत्खनन परिमानानुसार ठेकेदाराने त्याच्याकडे उपलब्ध असलेल्या ड्रेजरच्या क्षमतेनुसार ठेकेदाराने ड्रेजर संख्या निश्चित करून लिलावाद्वारे घेण्यात येणारा साठा/परिमाण उत्खनन करावे.

स्थळ -: मुंबई उपनगर जिल्हा
दिनांक -: ०५/१२/२०१७.

(वैदेही रानडे)
अपर जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

C:\Users\MIND\Desktop\वाळू लिलाव प्रक्रिया\MSD SAND AUCTION\Mantralaya.docx

# प्रपत्र-अ

**जिल्ह्याचे नांव - मुंबई उपनगर - मालाड खाडी (यांत्रिक साधनाद्वारे)**

१.(I) गट "AA" हा मालाड खाडी (वर्सोवा) मुखापासून सुरु होत असून सदर गटाची एकुण लांबी ५.५ कि.मी. एवढी आहे. गट "AA" हा यांत्रिकी/ड्रेजरद्वारे उत्खननास राखीव ठेवण्यात आला आहे.

(II) नकाशा क्रमांक १०३२, मुखापासून ते धारीवली, गट "AA" मधील उत्खननाचे परिमाण खालीलप्रमाणे उपगटाद्वारे देण्यात आलेले आहे.

| अक्र | नकाशा क्रमांक व गटाचे नांव | उप-गटाचे नांव | अक्षांश | रेखांश | नौकानयन जलमार्गातील गटांची लांबी व रुंदी व सरासरी उपलब्ध खोली व निर्माण / निश्चित करावयाची खोली (मीटरमध्ये). | MCZMA मान्यताप्रप्त उपलब्ध कालावधी करीता उत्खननासाठी अनुज्ञेय रेतीसाठा (परिमाण ब्रासमध्ये) | ड्रेझर्सची संख्या | हातची किमत रक्कम रुपयामध्ये | ई-निविदा/ई-लिलावाबाबत भरावयाची अनामत रक्कम रुपयामध्ये (रकाना ०९ मधील रक्कमेच्या २०% प्रमाणे) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | नकाशा क्रमांक १०३२ गट-AA | AA-३ | १) १९° ०८' ५४".१६<br>२) १९° ०८' ५३".९१<br>३) १९° ०९' १९".१४<br>४) १९° ०९' २१".०० | ७२° ४८' १४".९१<br>७२° ४८' १६".८०<br>७२° ४८' ३६".८६<br>७२° ४८' ३५".१४ | १००० X ६० X १.३३<br>निर्माण -निश्चित करावयाची खोली ३.०० | ३५४०६ | -- | ५२११७६३२ | १०४२३५२६ |
| २ | | AA-४ | १) १९° ०९' २१".००<br>२) १९° ०९' १९".१४<br>३) १९° ०९' ४४".२७<br>४) १९° ०९' ४५".७३ | ७२° ४८' ३५".१४<br>७२° ४८' ३६".८६<br>७२° ४८' ५९".४९<br>७२° ४८' ५७".४३ | १००० X ६० X ०.६३<br>निर्माण -निश्चित करावयाची खोली ३.०० | ५०२४७ | -- | ७३९६३५८४ | १४७९२७१७ |

अपर जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा[illegible]